REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# भारतातील शेतमजुरांचा अभ्यास



विशाखा विष्णुराव खेडकर
संशोधक विद्यार्थिनी

**सारांश ः –**

भारतातील शेतमजुरांचा अभ्यास यामध्ये शेतमजुरांच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आजही शेतीच आहे. त्यामुळे शेतमजुरांच्या संख्येत वाढ होत आहे. कृषीचा उगम, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे महत्व, शेतमजुरांचा इतिहास, ब्रिटीशपुर्व कालखंड, भारतातील वेगवेगळया राज्यांमधील शेतमजुरांची आकडेवारी इत्यादि घटकांचा अभ्यास केला आहे.

## प्रस्तावना ः –

भारतात शहरीकरणाचा वेग वाढत असताना देखील भारतातील खेडी आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहेत. **2011** नुसार भारतात **5.6** लाख खेडी असुन **72.22** टक्के लोकसंख्या ग्रामिण भागात राहते. कृषी क्षेत्रामध्ये **64** टक्के लोकसंख्या गुंतली असून **58** टक्के व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो. अशा भारतीय कृषी अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामिण विभागांमधील आर्थिक व सामाजिक जीवनाचा शेतमजुर हा महत्वाचा घटक आहे.

भारतासारख्या कृषीप्रधान अर्थव्यवस्था असणा–या देशात शेतमजुर वर्ग बराच मोठा आहे. भारतात अनेक शेतक–यांकडे शेतमजुर काम करताना दिसून येतात. शेतमजुरांमध्ये अज्ञान, निरक्षरता, दारिद्रय व त्यांचा कर्जबाजारीपणा, ग्रामीण समाजात त्यांना प्राप्त झालेले अत्यंत खालचे स्थान, ताठर समाज व्यवस्था अशा अनेक कारणांमुळे शेतमजुरांना आपली पिळवणुक होत असल्याचे दिसुन येत नाही.

## कृषीचा उगम ः –

कृषी हा शब्द "कृष" म्हणजे नांगरणे या धातुपासुन तयार झाला आहे. परंतु कृषी या संज्ञेचा अर्थ केवळ जमीन नांगरून त्यात पिक काढणे एवढयापुरता मर्यादित नाही. कृषी व्यवसायाचा व्याप खुप विस्तृत आहे. आपल्या अन्न व वस्त्राची गरज भागविणारे पदार्थ आपणास वनस्पती व प्राणी यांच्या पासुन मिळातात. म्हणुन अन्नधान्य उत्पादनाबरोबरच शेतीमध्ये पशुपालन, कुक्कुटपालन यांसारखे व्यवसायदेखील अंतर्भुत असतात. जनावरे सांभाळणे, मधमश्या पाळणे, रेशमाचे किडे पोसने, फळाचे उत्पादन घेणे इत्यादि उद्योगांचा समावेश कृषीमध्ये होतो. थोडक्यात मनुष्यबळ, प्राणी, अवजारे व यंत्रे यांच्या सहाय्याने जमीन कसून पीक काढणे याला कृषी कर्म किंवा शेती असे म्हणतात.

निर्वाहासाठी सहेतुकपणे जमिनीतुन पीके काढणे म्हणजेच कृषी असा अर्थ घेतला तर शेतीचा इतिहास इ.स.पुर्व **8** ते **10** हजार वर्षापेक्षा जुना नाही. तत्पुर्वी मानव रानटी अवस्थेत असताना जंगलातील जनावरे, प्राणी यांची शिकार करून त्यावर आपला उदरनिर्वाह करीत असावा असा अंदाज आहे. नंतर कंदमुळे, झाडांची फळे व तृणधान्ये यावर तो आपली उपजिवीका करू लागला. भटक्या टोळया करून एका ठिकाणवरून दुसरीकडे न फिरता स्थिर स्वरूपाच्या वसाहती करून मनुष्य राहु लागल्यावर पिकांचे संवर्धन केले जाऊ लागले. कृत्रीम अवजारांच्या सहाय्याने जमीन नांगरून खतांचा वापर करून शेती केल्यास जास्त उत्पादन घेता येते हे लक्षात आल्यावर तो नवीन पध्दतीने शेती करू लागला व यातुनच शेतीचा शोध लागला.

**भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे महत्व ः –**

प्राचीन काळापासुन कृषीक्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेमधील एक प्रमुख क्षेत्र राहिले आहे. भारतासारख्या विकसनशिल देशामधील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असुन देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा स्त्रोत शेती हाच आहे. देशातीलप्रचंड लोकसंख्येच्या रोजगार आणी जीवन निर्वाहाचे प्रमुख साधन तसेच औद्योगिक विकास आणि व्यापाराचा मुख्य आधार शेतीच आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा तर आहेच पण विकासाची गुरूकिल्ली आहे. सरासरी **1116** मी.मी. पाऊस पडतो व खरीप हंगाममध्ये पडणारा पाऊस हा **867** मी.मी. असुन हे प्रमाण जागतिक सरासरीपेक्षा (**865**) मी.मी. अधिक आहे. आपल्या देशाच्या मध्यातुन कर्कवृत्त जात असल्यामुळे उष्ण तापमान व भरपुर सुर्यप्रकाश उपलब्ध आहे व हे सर्व घटक कृषी विकासास पोषक आहेत. शिवाय हवामानातील विवीधता, मातीचे विविध प्रकार भारताला लाभले असल्यामुळे जगातील बहुतांश पिकांचे उत्पादन आपण घेऊ शकतो.

भारतीय अर्थव्यवस्था हि कृषीप्रधान असुन भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण असे महत्व आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जगाच्या लोकसंख्येत भारत दुस–या क्रमांकावर असून या **121** कोटी लोकसंख्येस अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची जबावदारी शेती क्षेत्रावर आहे. देशाच्या एकुण लोकसंख्येपैकी **60** टक्के लोकसंख्या आजही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबुन आहे. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा महत्वपुर्ण आहे. शेती ही देशातील लोकांच्या उपजिवीकेचे आणी रोजगाराचे प्रमुख साधन आहे. भारताच्या निर्यातीमध्ये कृषीप्रधान वस्तुचा समावेश असुन त्यामुळे देशाला बहुमोल परकीय चलन उपलब्ध होत आहे.

**शेतमजुरांचा इतिहास ः –**

**ब्रिटिशपुर्व कालखंड ः –**

प्राचीन काळात शेती ही संकल्पना अस्तित्वात नव्हती. आदिमानव टोळयाने राहत होते व आपल्या उपजिविकेसाठी शिकार, फळे, कंदमुळे इत्यादी साधनांव्दारे आपली उपजिविका करत. परंतु काळाच्या ओघात त्यांच्या असे लक्षात आले की, बीज पडल्यानंतर ते जमिनीत रूजते आणी त्यापासुन पुन्हा नवीन पिक घेता येते व अन्नधान्य पिकविण्यास सुरूवात केली. अनेक वेळा पिक घेऊन जमिनीचा कस कमी झाल्यावर पुन्हा दुस–या ठिकाणी शेती करू लागला. अशा प्रकारे शेतीचा उगम झाल्यानंतर सुपीक व पाण्याच्या ठिकाणी शेती करण्याच्या पध्दतीतुन गावांची निर्मीती झाली. गावांची वर्गवारी बलुतेदार पध्दतीची असल्याने शेतकरी व कारागीर यांच्यामध्ये वस्तू व सेवांची देवाणघेवाण होऊन लोकांच्या गरजा पुर्ण होत असल्याने शेतमजूर हा वर्ग अस्तित्वात नव्हता.

**ब्रिटिश कालखंड ः –**

सोळाव्या शतकामध्ये इंग्रज व्यापार करण्यासाठी भारतात आले. त्यांनी केवळ **70** हजार पौंड एवढया भांडवलावर ईस्ट इंडिया कंपनी सुरू करून **1775** च्या प्लासीच्या लढाईनंतर हिंदुस्तानवर राजकिय सत्ता प्रस्थापित केल्यानंतर ब्रिटिशांनी शेतक–यांच्या शेतावर कर आकारण्यास सुरूवात केली. कर गोळा करण्यासाठी गावातील जमीनदारांना अधिकार देण्यात आले. या पध्दतीतून ब्रिटिश काळामध्ये ग्रामीण भागाचे वर्गीकरण तीन गटांमध्ये होते असे.

अ) शेतकरी व जमीनदार वर्ग

ब) घरगुती उद्योगव्यवसायात काम करणारे कारागीर व शेतीत काम करणारा शेरमजुर वर्ग.

क) कुलकर्णी तलाठी यासारखे अधिकारी यापैकी शेतक–यांचे वर्गीकरण जमिनमालक व कुळे अशा दोन गटात केले जात, कुळे ही शेतमालकाकडे जमीनदारी पध्दत, महालवरी पध्दत, रयतवारी पध्दत या तीन पध्दतीच्य माध्यमतून राबत असत. या तीनही पध्दतीमध्ये जमिनीचा मालकी हक्क काही मुठभर व्यक्तींच्या हाती असे ते कुळांना जमीन कसण्याकरीता देण्यास स्वतंत्र असे. कुळांना कसण्याकरीता दिलेल्या जमिनीमध्ये कुळांच्या अधिकाराखाली गावातील काही शेतजमीन पडिक असेल तर ती देखील येत. त्या जमीनीचा शेतसाराही त्यांना भरावा लागत असे. म्हणजे हिच कुळे शेतकरी म्हणुन राबत असत व शेतीतील लाभांश शेतसारा म्हणून भरत असत.

याचाच अर्थ ब्रिटिश कालावधीमध्ये महसुलाच्या पध्दतीतून शेतीवर मजुरी करणारा व स्वतचे पोट भरणारा शेतमजुर हा वर्ग कुळ म्हणून अस्तित्वात आला. कुळे ही जमीनदार व सावकार यांच्या शेतजमिनीमध्ये राबत. जमिनीची मालकी वगळता या कुळांना शेतक–यांचा दर्जा होता.

अठराव्या शतकात इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर परदेशातुन औद्योगिक वस्तुंची आयात झाल्याने स्थानिक वस्तुंची स्पर्धा शक्ती कमी झाली व भारतात दिर्घकाळ असलेले हस्तउद्योग बंद पडले. हस्तउद्योगाच्या –हासामुळे बेकारी वाढली, शेतीवर

लोकसंख्येचा ताण वाढला. शेतीची मागणी वाढल्याने शेतीच्या किंमती व खंडात वाढ झाली. जमिनीचे विभाजन व तुकडीकरण वेगाने झाले. यातूनच अल्पभुधारक व शेतमजूर नर्माण झाले. वाढती लोकसंख्या व पर्यायी रोजगाराचा अभाव या कारणाने शेतमजुरांच्या संख्येत वाढ होत गेली.

## भारतातील वेगवेगळया राज्यांमधील शेतमजुरांची आकडेवारी :-

गेल्या 50 वर्षाच्या काळात भारतातील शेतमजुरांच्या संख्येत सातत्याने वाढ होताना दिसते. यामध्ये ग्रामिण समाजाचे विघटन, धारण क्षेत्राचा होत असलेला लहान आकार, धारणक्षेत्राचे अपखंडन, विभाजन, ग्रामिण लोकसंख्येत होत असलेली वाढ, इतर पर्यायी रोजगारांचा अभाव इ. कारणाने भारतातील शेतमजुरांच्या संख्येत वाढ होत असलेली दिसून येते.

### भारतातील राज्यांमधील शेतमजुरांची आकडेवारी (2011)

| अ.नं. | राज्य | पुरूष शेतमजुर | स्त्री शेतमजुर | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1) | आंध्र प्रदेश | 8131197 | 8837640 | 16968837 |
| 2) | अरूणाचल प्रदेश | 18389 | 17803 | 36192 |
| 3) | आसाम | 1129194 | 716136 | 1845330 |
| 4) | बिहार | 12570738 | 5774850 | 18345588 |
| 5) | छत्तीसगड | 2344901 | 2747237 | 5092138 |
| 6) | दिल्ली | 31429 | 8085 | 39514 |
| 7) | गोवा | 14809 | 11938 | 26747 |
| 8) | गुजरात | 3648785 | 3189885 | 6838670 |
| 9) | हरियाणा | 1041415 | 286942 | 1328357 |
| 10) | हिमाचल प्रदेश | 102985 | 72012 | 174997 |
| 11) | जम्मू–काश्मिर | 414403 | 133397 | 547800 |
| 12) | झारखंड | 2342085 | 2094197 | 4436282 |
| 13) | कर्नाटक | 3283139 | 3872680 | 7155819 |
| 14) | केरळ | 857834 | 464988 | 1322822 |
| 15) | मध्य प्रदेश | 6310031 | 5881560 | 12191591 |
| 16) | महाराष्ट्र | 6774524 | 6710952 | 13485476 |
| 17) | मणिपूर | 44053 | 67029 | 111082 |
| 18) | मेघालय | 106330 | 92044 | 198374 |
| 19) | मिझोराम | 22474 | 19302 | 41776 |
| 20) | नागालॅंड | 31856 | 31111 | 62967 |
| 21) | ओरिसा | 3481526 | 3258176 | 6739702 |
| 22) | पंजाव | 1239383 | 348961 | 1588344 |
| 23) | राजस्थान | 2133439 | 2806899 | 4940338 |
| 24) | सिक्कीम | 12885 | 13107 | 25992 |
| 25) | तामिळनाडू | 4842161 | 4764221 | 9606382 |
| 26) | त्रिपुरा | 214082 | 139517 | 353599 |
| 27) | उत्तराखंड | 286580 | 116719 | 403299 |
| 28) | उत्तरप्रदेश | 13802568 | 6136484 | 19939052 |
| 29) | प.बंगाल | 7453777 | 2736116 | 10189893 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **30)** | अंदमान–निकोबार | **3747** | **1037** | **4784** |
| **31)** | चंदीगढ | **1378** | **311** | **1689** |
| **32)** | दादर–नगर हवेली | **5451** | **12344** | **17795** |
| **33)** | दमण–दीव | **365** | **409** | **774** |
| **34)** | लक्षव्दिप | **00** | **00** | **00** |
| **35)** | पॉडेचरी | **42781** | **25600** | **68381** |
| **36)** | तेलंगणा | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

**संदर्भ ः – Census of India 2011 Population Profiles**

तक्त्यावरून **2011** च्या आकडेवारीनुसार राज्यनिहाय शेतमजुरांचा विचार करता सर्वाधिक उत्तर प्रदेश या राज्यात **19939052** शेतमजुर आहेत. या खालोखाल विहार, आंध्रप्रदेश या राज्यात शेतमजुरांची संख्या दिसुन येत आहे. महाराट्र राज्यात **13485476** शेतमजुर आहेत. सर्वात कमी दमण–दीव, चंदीगढ, अंदमान निकोबार इ.राज्यात आहे. कारण शेतीसाठी अनुकूल वातावरण नसल्याने शेतमजुर संख्या कमी असलेली दिसुन येते.

संदर्भ ः –


**1)** देशमुख प्रभाकर, भारतीय अर्थशास्त्र, पिंपळपुरे ॲंड कं. पब्लिकेशन. जुलै **2006**

**2)** हुंडेकर उत्तमराव, शहा प्रमोद, कदम संतोष, भारतीय अर्थव्यवस्था, अक्षरलेखन प्रकाशन.

**3)** कविमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन**2002**

**4)** कटमुसरे एस.वी. महाराष्ट्राचा कृषी विकास, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स **2011**